**प्रेसनोट** दि. 10/09/2025

**अँन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून बारामती तालुका पोलीस स्टेशनमधील महिला पोलीस हवालदार यांचेवर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | बारामती तालुका पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन 1988 चे कलमान्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय 39 वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | अंजना विभीषण नागरगोजे, वय 38 वर्ष, पद- पोलीस हवालदार ब.नं.2309/पुणे ग्रामीण, नेमणूक- बारामती तालुका पोलीस स्टेशन, पत्ता -फ्लॅट क्र. 201, निर्मिती विहार सोसायटी, रुई, ता. बारामती जिल्हा पुणे, (वर्ग-3) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | 20,000/- (वीस हजार) रुपये |
| पडताळणी दरम्यान तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | 20,000/- (वीस हजार) रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | 20,000/- (वीस हजार) रुपये |
| पडताळणी दिनांक | 10/09/2025 |
| सापळा दिनांक | 10/09/2025 |
| ठिकाण | बारामती तालुका पोलीस स्टेशन |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्रीमती सर्वदा सावळे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. 8275458733) |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदार व त्यांची पत्नी, सासू-सासरे व मेहुणा यांचे विरोधात त्यांच्या मेहुण्याचे पत्नीने बारामती तालुका पोलीस ठाण्यात दि.2/9/2025 रोजी कलम 498 अ, 504, 506 भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. यातील आरोपी लोकसेवक महिला पोलीस हवालदार श्रीमती अंजना नागरगोजे ब.नं.2309 यांच्याकडे या गुन्ह्याचा तपास देण्यात आला होता. सदर गुन्हयात तक्रारदार व त्यांचे इतर तीन नातेवाईक यांना गेट जामीन देऊन अटक न करण्यासाठी लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे एक लाख रुपयांची लाच मागणी केली होती तडजोडीअंती तक्रारदार त्यांची पत्नी आणि त्यांचे सासू-सासरे या चार आरोपींसाठी प्रत्येकी पाच हजार रुपये प्रमाणे एकूण 20 हजार रुपये लाचेची मागणी केल्याबाबतची तक्रार तक्रारदार यांनी दि.9/9/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांच्याकडे फोनद्वारे केली होती.

तक्रारदाराच्या वरील तक्रारीच्या अनुषंगाने आज दि.10/9/2025 रोजी तक्रारदार यांना बारामती येथे समक्ष भेटून पडताळणी कारवाई केली असता आलोसे श्रीमती नागरगोजे यांनी पंचासमक्ष तक्रारदाराकडे त्यांना व त्यांच्या इतर तीन नातेवाईकांना त्यांच्यावर दाखल असलेल्या गुन्ह्यामध्ये गेट जामीन देऊन अटक न करण्यासाठी 20,000/- रुपये लाच मागितल्याचे निष्पन्न झाले.

वरील प्रमाणे लाच मागणी पडताळणी केल्यानंतर आज दि. 10/9/2025 रोजी सापळा कारवाई दरम्यान आ.लो.से. श्रीमती नागरगोजे यांनी तक्रारदाराकडून त्यांच्या वरील कामासाठी बारामती तालुका पोलीस ठाण्याचे आतमध्ये 20,000/- रुपयाची लाच स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. वरील आरोपी लोकसेवक यांच्याविरुद्ध बारामती तालुका पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण या ठिकाणी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 नुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे.

**सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823137154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.**

1) **अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक** - 020 - 26122134, 26132802, 26050423, 9403781064
2) **व्हॉट्स-ॲप क्रमांक** - 9403781064 (पुणे), 9930997700 (मुंबई)
3) **ई-मेलआयडी - पुणे** dyspacbpune@mahapolice.gov.in
4) **वेबसाईट** - www.acbmaharashtra.gov.in
5) **ऑनलाईन ॲप तक्रार** - www.acbmaharashtra.net.in

10/9/25

**(दयानंद गावडे)**
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.
**(मोबाईल क्रमांक- 9423884745)**

सहायक पो.आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक
सत्यमेव जयते
अँन्टी करप्शन ब्युरो

Scanned with CamScanner